

# काही महत्वाच्या गवत प्रजातींची ओळख

तोत्लाडोह, पेंच व्याघ्र प्रकल्प

मोठी मारवेल



मोठी मारवेल





**स्थानिक नाव :** **मोठी मारवेल**
**शास्त्रीय नाव :** *Dichanthium caricosum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** वर्षभर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर ते मे
**आढळ :** काळया खोल जमिनीत
**इतर माहिती :** झुबकेदार, बहुवर्षिय खोड, पेरावर केसाळ लव, पाण्यात बुडाल्यास दलदल सहन करण्याची चांगली क्षमता. काळी अथवा वालुकामिश्रित कोरडी जमिन उपयुक्त. बी पेरणी अथवा ठोंब लागवडीद्वारे अभिवृध्दी होते. चितळांसाठी मुलायम, उच्च प्रजातीची पोषक, गवत प्रजाती आहे.
**सहयोगी :** कुसळ, गोंधळ, मोशान, मोतीतुरा, गोंडाळी / गोंड,
**उंची :** 60 ते 90 सें.मी

**स्थानिक नाव :** **छोटी मारवेल**
**शास्त्रीय नाव :** *Dichanthium annulatum*
**उपयोगीता :** उत्कृष्ठ खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – मे
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – मे
**आढळ :** सर्वत्र
**इतर माहिती :** मोठया मारवेल प्रमाणे सर्व तृणभक्षक प्राण्यांसाठी उपयुक्त. झुबकेदार गवत, पेरावर केसाळ लव असते. चवीस गोड आहे. खोडावर भरपूर पाने असतात. अल्पकाळासाठी पाण्यात बुडाल्यास टिकाव धरु शकते. काळया खोल जमिनीत चांगली वाढ होते. आम्लयुक्त जमिनीत वाढत नाही. या प्रजातीचा प्रसार बिया पासून व सकर्स पासून होतो. ठोंब लागवडीद्वारे या गवताची लागवड करता येते.
**सहयोगी :** रानबाजरा, भुरभुशी, मोठी मारवेल, कुसळी.
**उंची :** 60 ते 90 सें.मी

## काळी कुसळी



## वैद्य गवत



*अडवा माती जीरवा पाणी। आजच्या युगाची आहे ही वाणी।।*



**स्थानिक नाव : काळी कुसळी**
**शास्त्रीय नाव :** *Heteropogon contortus*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** फेब्रुवारी – मार्च
**आढळ :** उघडया तसेच गवताळ प्रदेशात
**इतर माहिती :** झुबकेदार, ताठ वाढणारे, 5 ते 10 से.मी. लांबीची कुसळे, ही प्रजाती मोठी कुसळी या नावाने ओळखली जाते. अवर्षण सहन करण्याची क्षमता चांगली. पुरात बुडाल्यास सहन करण्याची क्षमता अल्प. वालुकामय लोमयुक्त जमिनीत चांगली वाढ होते. काळया जमिनीत वाढ मंद गतीने होते. हलक्या जमिनीत चांगले येते. नैसर्गिकरित्या प्रसार उत्तम होतो. ज्या भागात वारंवार आगी लागतात तेथे अधिक प्रसार होतो. कुसळे लागण्यापूर्वी चारणी व कापणीस योग्य. कोवळे असताना अधिक रुचकर. शुष्क चारा म्हणून याचे फार महत्व आहे. रानगवा व निलगाय साठी उपयुक्त.
**सहयोगी :** गोंधळी, डोंगरी, तिखाडी, लहान मारवेल.
**उंची :** 30 ते 150 सें.मी

**स्थानिक नाव : वैद्य गवत**
**शास्त्रीय नाव :** *Bothriochloa pertusa*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** सर्वत्र दलदलयुक्त भागात, नदी, नाल्या काठी, शेतीचे बांध, रस्त्यांच्या कडा इत्यादी.
**इतर माहिती :** 30 ते 70 से. मी. उंची, झुबकेदार, सरळ वाढणारे गवत बियांवर एक काळा खड्डा असतो. खोडाच्या पेरावर केसाळ लव असते. गाळाच्या जमिनीत काही काळ बुडल्यास तसेच पाणी साठून दलदल झाल्यावर सहन करु शकते. अगदी हलक्या जमिनीवर येते. काळया चिकण जमिनीवर सुध्दा दिसुन येतो. नैसर्गिक प्रसार जलद होतो. इतर गवतांना दाबून टाकते. तीव्र चराई, पायदळी तुडवणे सहन करु शकते. धूप नियंत्रक म्हणून हे उत्तम आहे. स्वादिष्ट, नीलगाय, सांबर, चितळ यांसाठी उपयुक्त आहे.
**सहयोगी :** खस गवत व जंगली दुर्वा.

*निसर्ग मानवाचा मित्र खरा। वृक्ष प्राणवायूचा आहे झरा।।*

## डुब गवत



## मोशन / मुशेल





**स्थानिक नाव :** डुब गवत / जंगली हरीयाली
**शास्त्रीय नाव :** *Cynodon barberi*
**उपयोगीता :** फुलोऱ्या पूर्वी खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** जुलै – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** सावली मध्ये / मुरमाड / ओल्या जागेवर
**इतर माहिती :** बहुवार्षिक प्रकारचे गवत असुन वर्षभर हिरवे असते. मोठया प्रमाणात चाऱ्यासाठी वापर करतात. ह्या गवताला हिंदु धर्मात पवित्र मानतात. चितळ / सांबर / नीलगाय या वन्य प्राण्यांसाठी अत्यंत उपयोगी आहे.
Mono-cropping (monotype) - एकाच प्रकारचे येते
**उंची :** 1.5 ते 2 ft

**स्थानिक नाव :** मोशान / मुशेल
**शास्त्रीय नाव :** *Iseilema laxum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** दलदलीच्या ठिकाणी, काळ्या मातीमध्ये आढळतो
**इतर माहिती :** बहुवार्षिक प्रकारचे गवत असुन ह्या गवताची मुळे मजबूत असतात पानांची लांबी 10 ते 14 सें.मी असते. उत्कृष्ट खाद्य प्रकारचे गवत असुन जनावरे हिरवे असतांना आवडीने खातात. चितळ, रानडुक्कर, भेकर, गवा, यासारख्या वन्यजीवांसाठी उपयुक्त,
**सहयोगी :** रानदूर्वा, मारवेल, चिमणचारा, यासारख्या गवत प्रजाती वाढतात,
**उंची :** 30 ते 120 सें.मी

## गोंडे गवत



## छोटा पौन्या





**स्थानिक नाव :** गोंडे गवत
**शास्त्रीय नाव :** *Chloris Barbata*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक प्रकारचे गवत वाळेपर्यंत ही खाद्य बनतात.
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** खुले माळरान, मध्यम उंचीचा गवताळ प्रदेश, सपाट प्रदेश व मृदेची आर्द्रता जास्त असलेल्या ठिकाणी.
**इतर माहिती :** चितळांसाठी उंची 1ft पुरेशी. पानांचा आकार जास्त लांब व रुंद (10 ते 15 से. मी.). पाने मुलायम सकस व चवदार, तंतू नाही. वाळल्यावर ही खाद्यास उपयोगी.
**सहयोगी :** मारवेल, मोशान, भुरभुशी.

**स्थानिक नाव :** छोटा पौन्या
**शास्त्रीय नाव :** *Sehima nervosum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** खुल्या माळरानात.
**इतर माहिती :** पाने लुसलुसीत 15 ते 30 सें.मी. लांबीची, उच्च पौष्टीक खाद्य प्रजाती, खडकाळ मुरमाड मातीमध्ये वाढणारी.
**सहयोगी :** काळी कुसळ, गोंधळी, तिखाडीसारख्या गवत प्रजाती वाढतात. ही प्रजाती चितळ, नीलगायसाठी उपयुक्त.
**उंची :** 90 ते 120 सें.मी.

बडा फुलेरा



बोदील्या



जेथे वाघाचे अस्तित्व तेथे वन समृद्ध। जेथे वन समृद्ध तेथील जीवन समृद्ध।।



**स्थानिक नाव :** **बडा फुलेरा**
**शास्त्रीय नाव :** *Chrysopogon fulvus*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** खुल्या मैदानात आणि खडकाळ जमिनींवर
**इतर माहिती :** उंच प्रकारचे गवत असुन पाने वन्यप्राण्यांसाठी उत्तम खाद्य आहे चितळासाठी उपयुक्त आहे.
**उंची :** 30 ते 100 सें.मी.

**स्थानिक नाव :** **बोदील्या**
**शास्त्रीय नाव :** *Paspaladium flavidum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** दलदलयुक्त व दमट ठिकाणी तसेच नदी – नाल्यांकाठी व सावलीत वाढणारी गवत प्रजाती.
**इतर माहिती :** खाद्य प्रकारचे गवत असुन त्याची पाने, बिया गवा हा प्राणी आवडीने खातो.
**उंची :** 120 सें.मी. पर्यंत.

वाघाविना जंगलाचा ऱ्हास होतो। अन् जंगलाविना वाघाचा!

## गोंडाळी



## लाल गवत



धरती माँ की एक ही पुकार। बच्चे कम हो पेड हजार।।



**स्थानिक नाव :** **गोंडाळी**
**शास्त्रीय नाव :** *Chloris virgata*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक प्रकारचे गवत वाळेपर्यंत ही खाद्य बनतात.
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** खुले माळरान, मध्यम उंचीचा गवताळ प्रदेश, सपाट प्रदेश व मृदेची आर्द्रता जास्त असलेल्या ठिकाणी.
**इतर माहिती :** पानांचा आकार जास्त लांब व रुंद (10 ते 15 से.मी.). पाने मुलायम सकस व चवदार, तंतू नाही. वाळल्यावर ही खाद्यास उपयोगी. चितळांसाठी उपयुक्त आहे.
**सहयोगी :** मारवेल, मोशान, भुरभुशी.
**उंची :** 30 ते 35 सें.मी.

**स्थानिक नाव :** **लाल गवत / दिवरतन**
**शास्त्रीय नाव :** *Andropogon pumilus*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** सर्वत्र व रेताड ठिकाणी
**इतर माहिती :** वार्षिक प्रकारचे गवत असुन दिसायला लालसर रंग आढळून येतो.चितळासाठी उपयुक्त आहे.
**सहयोगी :** मोशाम गवत
**उंची :** 30 ते 60 सें.मी.

नव्या पिढीचे एकच लक्ष। आजचे रोपटे उद्याचे वृक्ष।।

## मोती तुरा



## डोंगरी गवत



पर्यावरणाचा होता ऱ्हास। आयुष्याचा होईल नाश।।



**स्थानिक नाव :** **मोती तुरा**
**शास्त्रीय नाव :** *Apluda varia*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी
**आढळ :** काळया मातीमध्ये व सावलीच्या ठिकाणी प्रामुख्याने आढळते.
**इतर माहिती :** सकस खाद्य प्रकारचे गवत आहे. फुलांच्या रचने मध्ये बदल. बियांच्या आकारामध्ये बदल
**उंची :** 30 ते 150 सें.मी.


**स्थानिक नाव :** **डोंगरी गवत**
**शास्त्रीय नाव :** *Chrysopogon polyphyllus*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – डिसेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर
**आढळ :** उंच प्रकारची गवत प्रजाती (3 ते 4 ft) असणाऱ्या भागात, खडकाळ माती
**इतर माहिती :** कमी पर्जन्य काळात लागणारी प्रजाती, कापणी – नोव्हेंबर. सांबर, चितळ यांसाठी उपयुक्त
**सहयोगी :** गोंधळी / कुसळी

जेथे गर्द झाडीचे वन। तेथे शुद्ध हवा, पाऊस छान।।

## बेर गवत



## मोठा पौन्या



**स्थानिक नाव :** **बेर गवत**
**शास्त्रीय नाव :** *Ischaemum sulcatum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** धानाच्या शेतीसारख्या मातीमध्ये, जंगलामध्ये ज्या ठिकाणातून पाणी वाहते अशा ठिकाणी किंवा नाल्याकाठी वन तलावाच्या काठी.
**इतर माहिती :** फुलोऱ्यावर आल्यावर लाल रंगाचे दिसते. एका फुलोऱ्याच्या 2 फळ्या असतात. चितळ, भेकर, गवा, यांसारख्या वन्यजीवासाठी उपयुक्त.

**स्थानिक नाव :** **मोठा पौन्या**
**शास्त्रीय नाव :** *Sehima sulcatum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**बियांचा कालावधी :** फेब्रुवारी – मार्च
**आढळ :** काळया व मुरमाड मातीमध्ये येणारी
**इतर माहिती :** फुलावर येण्याआधी खाद्य उपयोगी असल्याने तेंव्हांच गवताची कापणी करावी. कापणीचा कालावधी माहे नोव्हेंबर.
**सहयोगी :** कुसळी, गोंधळी, पवन्या,
**उंची :** 20 ते 30 सें.मी.

## मोती तुरा



## लहान गवत





**स्थानिक नाव :** **मोती तुरा**
**शास्त्रीय नाव :** *Apluda mutica*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** मुरमाड मातीमध्ये व सावलीच्या जमीनीवर प्रामुख्याने आढळणारे गवत, डोंगराळ भागात
**इतर माहिती :** खाद्य प्रकाराचे गवत असुन फुले वगळून इतर भाग खाण्या योग्य असते. लाल रंगाची फुले असतात. बी गोळा करण्याचा कालावधी माहे नोव्हेंबर व डिसेंबर. नीलगाय, चितळ यासाठी उपयोगी आहे.
**सहयोगी :** गोंधळ, कुसळ, मारवेल
**उंची :** 30 ते 150 सें.मी.

**स्थानिक नाव :** **लहान गवत**
**शास्त्रीय नाव :** *Themeda triandra*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** वार्षीक प्रकारचे गवत असुन खुल्या माळरानात व डोंगराच्या उतारावर ही गवत प्रजाती आढळते.
**इतर माहिती :** हे फुलोऱ्या पूर्वी खाद्य प्रकारचे गवत असुन वन्यप्राण्यांसाठी पौष्टिक आहे. तसेच सुकल्या नंतर सुद्धा चारा म्हणुन उपयोगात आणता येतो. चितळ, सांबर यांना उपयुक्त आहे.
**सहयोगी :** गोंधळ, कुसळ
**उंची :** 30 ते 90 सें.मी.

## मोठी गोंधळ किंवा धोण्याड



## रान बाजरा



वृक्षवल्लीमध्ये रमावे। तुझीया पुढती नम्र व्हावे।।



**स्थानिक नाव : मोठी गोंधळ किंवा धोण्याड**
शास्त्रीय नाव : *Themeda quadrivalvis*
उपयोगीता : खाद्य
गवतांचा प्रकार : वार्षिक
फुलांचा कालावधी : ऑक्टोबर – नोव्हेंबर
बियांचा कालावधी : डिसेंबर – जानेवारी
आढळ : मुरमाड माती, ज्या मातीची आम्लता जास्त अशा ठिकाणी व खुल्या माळराणात इतर गवतासोबत वाढणारी गवत प्रजाती.
इतर माहिती : वार्षिक गवत प्रजाती असुन 90 ते 150 सें.मी. पर्यंत उंची असलेले झुबकेदार गवत, ताठ खोड, पेर केशवीरहीत. एकाच झुबक्यात उसलेली पाने, पानाची लांबी 7 ते 30 सें. मी. खोड पिवळसर रंगाचे व कठीन आणि लांब कुसळे असलेले गवत आहे. ही गवत प्रजाती गवा, नीलगायसाठी उपयुक्त आहे.
सहयोगी : काळी कुसळ, मारवेल, पवन्या, शेळा.
उंची : 90 ते 150 सें.मी.

**स्थानिक नाव : रान बाजरा**
शास्त्रीय नाव : *Setaria pumilla*
उपयोगीता : खाद्य
गवतांचा प्रकार : वार्षिक
फुलांचा कालावधी : ऑगस्ट – सप्टेंबर
बियांचा कालावधी : सप्टेंबर – ऑक्टोबर
आढळ : मध्यम उंचीच्या गवताळ प्रदेशामध्ये व खुल्या मैदानात
इतर माहिती : चितळ, भेकर, रानडुक्कर यांसाठी उपयुक्त
सहयोगी : मारवेल, घोण्याड, शिकाळा, भुरभुसी.
उंची : 30 ते 100 सें.मी.

भविष्य तुमचे तुमच्या ठायी। पाणी तुम्हाला जीवन देई।।

## जंगली ज्वारी



## लहान घोंढल



पाणी आहे अनमोल खजीना। जिवनाचा खरा दागिना।।



**स्थानिक नाव :** **जंगली ज्वारी**
**शास्त्रीय नाव :** *Sorghum purpurens*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी
**आढळ :** खुल्या माळराणात आढळणारी गवत प्रजाती
**इतर माहिती :** ही गवत प्रजाती कोवळी असतांना जनावरांसाठी उत्तम प्रकारचे खाद्य म्हणुन वापरता येतो.
**उंची :** 120 ते 135 सें.मी.

**स्थानिक नाव :** **लहान गोंधळ**
**शास्त्रीय नाव :** *Themeda laxa*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** नदीकाठी, ओलाव्याचे ठिकाण
**इतर माहिती :** फुलोरा येण्यापूर्वी हे गवत उत्तम खाद्य म्हणुन वापरता येतो. चितळ, नीलगाय साठी उपयुक्त.
**सहयोगी :** खस, बेर, वैद्य,
**उंची :** 100 ते 150 सें.मी.

निसर्गाला गुरु मानून त्याच्याकडून भरपूर ज्ञान मिळवा

राई



खस





**स्थानिक नाव :** **राई**
**शास्त्रीय नाव :** *Digitaria abludens*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** खुल्या माळरणात आढळणरी वार्षिक गवत प्रजाती आहे.
**इतर माहिती :** ही गवत प्रजाती ताठ असुन त्यांची पाने लांब व अरूंद असतात. पेरावर केश आढळुन येतात. चितळांसाठी हे गवत उपयुक्त आहे.
**सहयोगी :** रानबाजरा, मारवेल, भूरभूसी, चिकटा, दूर्वा
**उंची :** 15 ते 45 सें.मी.

**स्थानिक नाव :** **खस**
**शास्त्रीय नाव :** *Vetiveria zizanioides*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** मार्च – एप्रिल
**आढळ :** दलदलीच्या मातीमध्ये पाणथळ ठिकाणी आढळते
**इतर माहिती :** या प्रजातीची वर्षातून दोन ते तीनदा कापणी केल्यास वर्षभर वन्यप्राण्यांसाठी चारा उपलब्ध होऊ शकतो. वाघ, बिबट व इतर मांसभक्षी प्राण्यांसाठी लपन म्हणून उपयुक्त आहे. चितळ, सांबर, नीलगाय यांना कोवळे गवत उपयुक्त ठरते.
**उंची :** 90 ते 150 सें.मी.

## अंजन



## चिटका / सावा



अडवा माती जीरवा पाणी। आजच्या युगाची आहे ही वाणी।।



**स्थानिक नाव :** **अंजन**
**शास्त्रीय नाव :** *Cenchrus cilliaris*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** उघडया, मोकळया क्षेत्रात, डबकी तलावाच्या कडेला आढळते
**इतर माहिती :** झुबकेदार ताठ वाढणारे खोड, पाने सपाट लांबी 5 ते 20 सें.मी. अल्प लव असलेली केसाळ, मंजिरी अल्प ते संख्येने बरेच असतात. रूक्ष व अत्यल्प पावसाच्या प्रदेशात येते. अवर्षण सहन करण्याची क्षमता उत्तम आहे. स्वादिष्ट उसून प्राणी आवडीने खातात.
**सहयोगी :** मारवेल, घोण्याड, गोंडे गवत
**उंची :** 40 ते 60 सें.मी.

**स्थानिक नाव :** **चिकटा / सावा**
**शास्त्रीय नाव :** *Setaria Intermedia*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** खुल्या माळाराणात, झाडांच्या सावलीत, काळया चिकण जमिनीत अधिक आढळ दिसून येतो.
**इतर माहिती :** एक वर्षिय उंच वाढणारे, ताठ खोड, खोडावर भरपूर पाने, पानाची लांबी 10 ते 25 सें.मी. गवत सावली अथवा मध्यम सूर्यप्रकाशात भरभर वाढते व फुलोरा येनापूर्वी खाण्यास उपयुक्त आहे.
**सहयोगी :** मारवेल, गोंडे गवत
**उंची :** 60 ते 90 सें.मी.

निसर्ग मानवाचा मित्र खरा। वृक्ष प्राणवायूचा आहे झरा।।

मोठी रानजोंधळ



तिखाडी / रोशा गवत



जो करेल संवर्धन वृक्षाचे।    जडेल नाते प्रभूशी तयाचे।।



**स्थानिक नाव :** **मोठी रानजोंधळ**
**शास्त्रीय नाव :** *Coix aquatica*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** ओलाव्याच्या ठिकाणी, नदीच्या काठावर व खोलगट भागात आढळणारी गवत प्रजाती
**इतर माहिती :** झुबकेदार ताठ वाढणारे, पाने लांबट असून खाण्यास अयोग्य.
**उंची :** 100 ते 125 सें.मी.

**स्थानिक नाव :** **तिखाडी / रोशा गवत**
**शास्त्रीय नाव :** *Cymbopogon martinii*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** समूहाने वाढण्याची प्रवृत्ती. सुपीक तसेच मुरमाड जमिनीवर येते. लांबूनही स्पष्ट ओळखू येते. हलक्या व निचरा होणाऱ्या जमिनीत तसेच मोकळया क्षेत्रात आढळ अधिक. विदर्भात पुष्कळ प्रमाणांत आढळते.
**इतर माहिती :** उंच सरळ वाढणारे, झुबकेदार, बहुवर्षिय गवत. खोडावर भरपूर पाने असतात व पाने चुरगळल्यास त्यास वास येतो. पानाची लांबी 10 ते 25 सें.मी. मोतिया गवताचे पानापासून बहुमूल्य पानरोशा तेल व सोफिया तेल मिळते. मोतिया गवतात पाने खोडावर काटकोनात किंवा विशाल कोनात धारण होतात. पानास असणाऱ्या खाज येणाऱ्या केसाळ लवेमुळे गवत खाण्यास अयोग्य असते तथापि कोवळे गवत जनावरे खातात.
**उंची :** 90 ते 180 सें.मी.

पाणी साठवा समृद्ध व्हा।

## जंगली कुटकी



## कंस / पडयाळ गवत





**स्थानिक नाव :** **जंगली कुटकी**
**शास्त्रीय नाव :** *Panicum psilopodium*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** जानेवारी – फेब्रुवारी
**आढळ :** सावलीत व उंच डोगराळ प्रदेशात आढळणारी गवत प्रजाती
**इतर माहिती :** हे एक खाद्य प्रकारचे गवत असून सरळ वाढणारे, पानाची लांबी आखूड असून उत्तम खाद्य आहे.
**उंची :** 30 ते 60 सें.मी.

**स्थानिक नाव :** **कंस / पडयाळ गवत**
**शास्त्रीय नाव :** *Saccharum spontaneum*
**उपयोगीता :** खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी
**आढळ :** सर्वसाधारण काळया मातीत, नदि–नाल्याच्या काठावर आढळणारी गवत प्रजाती.
**इतर माहिती :** उंच, सरळ, ताठ वाढणारे मुळे सरपटणारे, पाने लांब निमुळते असून कोवळी असतांना प्राण्यास खाण्यायोग्य आहे. वर्षातून दोन वेळा कापणी केल्यास वर्षभर हिरवा चारा उपलब्ध होतो.
**उंची :** 100 ते 200 सें.मी.

## फुटाना गवत



## दिनानाथ





**स्थानिक नाव :** **फुटाना गवत**

**शास्त्रीय नाव :** *Oplismenus burmannii*

**उपयोगीता :** अखाद्य

**गवतांचा प्रकार :** वार्षिक

**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर

**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर

**आढळ :** उघडया मैदानात तसेच सावलीत वाढणारी गवत प्रजाती आहे.

**इतर माहिती :** ही गवत प्रजाती वार्षिक प्रकारची असुन जमीनीवर पसरट वाढते. पाने रूंद व पानांवर केसाळ लव आढळून येते.

**उंची :** 15 ते 45 सें.मी.

**स्थानिक नाव :** **दिनानाथ**

**शास्त्रीय नाव :** *Pennisetum pedicellatum*

**उपयोगीता :** अखाद्य

**गवतांचा प्रकार :** वार्षिक

**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर

**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी

**आढळ :** मोकळे तसेच निकृष्ट झालेल्या उघडया कुरण क्षेत्रात आढळते.

**इतर माहिती :** एक वर्षिय, ताठ, उंच वाढणारे, खालुन शाखा फुटणारे, भरपूर पाने असणारे गवत आहे. पानाची लांबी 15 ते 25 सें.मी. असून केशविरहित असतात. कणीस 10 ते 12 सें. मी. लांब, गोल भरपूर फुले असलेले. परप्रांतीय गवत. यापासून स्थानिक गवत प्रजातींना धोका संभवतो व स्थानिक जैवविविधतेवर दुष्परिणाम होतो.

**उंची :** 100 ते 150 सें.मी.

दाब



क्रो फुट






**स्थानिक नाव :** **दाब**
**शास्त्रीय नाव :** *Imperata cylindrica*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** मे – जुलै
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** सावलीमध्ये
**इतर माहिती :** बहुवार्षिक प्रकारचे सरळ वाढणारे गवत आहे. गवताचे रायझोम हे जमीनीवर पसरट जातात. गवताच्या पात्यांना धार असते त्यामुळे वन्यप्राण्यांना खाण्यासाठी योग्य नाही. परंतु रानगव्यासाठी फुलोऱ्यावर येण्याआधी खाण्यायोग्य असते. या गवताची वर्षातुन दोन ते तीनदा कापणी केल्यास कोवळे गवत प्राण्यांना खाण्यासाठी योग्य असते. गवताची कापणी सप्टेंबर व डिसेंबर महीण्यात करावी. गवताचा प्रसार सकर्सच्या माध्यमातून होतो.
**उंची :** 30 ते 60 सें.मी.

**स्थानिक नाव :** **क्रो फुट**
**शास्त्रीय नाव :** *Eleusine indica*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** जुलै – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी
**आढळ :** सावलीत येणारी गवत प्रजाती, ओलसर जमीनींवर
**इतर माहिती :** ताठ वाढणारी गवत प्रजाती, पाने लांब व चितळ, नीलगाय, गवा यांसाठी उपयुक्त.
**सहयोगी :** मारवेल, भुरभुशी, चिमण चारा
**उंची :** 30 ते 60 सें.मी.

## पांढरी कुसाळी



## मोठा शीका





**स्थानिक नाव : पांढरी कुसळी**
**शास्त्रीय नाव :** *Aristida hystrix*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** हलक्या माळरानावर येणारी प्रजाती, आम्लधर्मीय जमीन या गवतास मानवते, कोरड्या व कमी दर्जाच्या मातीत येणारे गवत. उष्ण व अत्यल्प पावसाच्या रूक्ष प्रदेशात आढळते.
**इतर माहिती :** एक वर्षिय, ताठ अथवा पसरत जाणारे पण आकाराणे लहान असणारे खोड, खोड गुळगुळीत, पेर केशविरहीत. जनावरे कोरडे गवत खातात परंतु जनावरांना ओला चारा अथवा सुके गवत म्हणून याचा फारस उपयोग होत नाही. मातीच्या निर्मितीसाठी उपयोगी, कोरड्या जमिनीची निदर्शक प्रजाती
**उंची :** 100 ते 150 सें.मी.

**स्थानिक नाव : मोठा शीका**
**शास्त्रीय नाव :** *Chloris truncacea*
**उपयोगीता :** फुलोऱ्या पूर्वी खाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** जुलै – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** सावली मध्ये आढळणारी गवत प्रजाती मुख्यतः नाल्याच्या कडेस, ओलसर अथवा पाणथळ भागात आढळून येते.
**इतर माहिती :** बहुवर्षिय, झुबकेदार, ताठ वाढणारे खोड, खोडास खालचे बाजुस अधिक पाने असतात. पेरामधील अंतर जास्त असते व पेर केशविराहीत खोड गुळगुळीत व पीवळसर रंगाचे असते. पक्व होण्यापूर्वी खाण्यास योग्य. शुष्क गवत म्हणून उपयोगीता फारशी नाही. चितळ, सांबर, नीलगाय यांसाठी उपयुक्त.
**उंची :** 60 ते 150 सें.मी.

## कुंदा गवत



## भुरभुसी





**स्थानिक नाव :** **कुंदा गवत**
**शास्त्रीय नाव :** *Ischaemum nervosum*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** बहुवार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**बियांचा कालावधी :** फेब्रुवारी–मार्च
**आढळ :** कोरडया, मुरमाड किंवा काळया मातीत, बांधावरती आढळणारी गवत प्रजाती आहे.
**इतर माहिती :** बहुवार्षिक प्रकारची गवत प्रजाती असुन जमिनीवर पेरामधुन फुटणाऱ्या मुळांमुळे पसरत जाते. खोड ताठ, पाने लांब असतात. मातीची धूप रोखण्यासाठी उपयुक्त. पानांवरती काटेरी केस असतात म्हणून अखाद्य.
**सहयोगी प्रजाती :** गोंधळ, कुसळ, मोतीतुरा
**उंची :** 60 ते 90 सें.मी.

**स्थानिक नाव :** **भुरभुसी**
**शास्त्रीय नाव :** *Eragrostis viscosa*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** ओलाव्याच्या ठिकाणी
**इतर माहिती :** ही गवत प्रजाती वार्षिक प्रकारची असून ताठ प्रकारचे गवत आहे. वन्य प्राण्यांना खाण्यास अयोग्य. मुळे रानडुकरांसाठी उपयुक्त.
**उंची :** 10 ते 12 से.मी.

## चिमणचारा



**स्थानिक नाव :** **चिमणचारा**
**शास्त्रीय नाव :** *Eragrastic unioloides*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर
**आढळ :** ओलसर ठिकाणी, रेताड, खडकाळ, मुरमाड जमीनीवर आढळते.
**इतर माहिती :** ही गवत प्रजाती वार्षिक प्रकारची असुन खोड सरळ व ताठ वाढते. पाने मऊ व केसाळ लव असते. त्यामुळे वन्यप्राण्यास खाण्यायोग्य नाही.
**उंची :** 15 ते 20 से.मी.

## जंगली ज्वारी



**स्थानिक नाव :** **जंगली ज्वारी**
**शास्त्रीय नाव :** *Sorghum halapens*
उपयोगीता : अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी
**आढळ :** मुरमाड जागेवर व सावलीत वाढणारी गवत प्रजाती.
**इतर माहिती :** सरळ वाढणारी, पाने अरूंद व लांब असून जनावरांना खाण्यास अयोग्य.
**उंची :** 50 ते 150 सें.मी.

## फुलसी गवत



## भुरभूशी



जेथे वाघाचे अस्तित्व तेथे वन समृद्ध। जेथे वन समृद्ध तेथील जीवन समृद्ध।।



**स्थानिक नाव :** **फुलसी गवत**
**शास्त्रीय नाव :** *Melanocenchrus jacquemonii*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** ऑगस्ट – सप्टेंबर
**बियांचा कालावधी :** नोव्हेंबर – डिसेंबर
**आढळ :** खडकाळ प्रदेशात व दगडांच्या भेगामध्ये आढळणारी गवत प्रजाती
**इतर माहिती :** वार्षिक प्रजातीचे गवत असून प्राण्यांना खाण्यायोग्य नाही.
**उंची :** 10 ते 30 सें.मी.

**स्थानिक नाव :** **भुरभूशी**
**शास्त्रीय नाव :** *Eragrostis gangetica*
**उपयोगीता :** अखाद्य
**गवतांचा प्रकार :** वार्षिक
**फुलांचा कालावधी :** सप्टेंबर – ऑक्टोबर
**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी
**आढळ :** साधारणतः नदी व नाल्याच्या काठावर आढळणारी गवत प्रजाती.
**इतर माहिती :** वार्षिक प्रकारचे सरळ वाढणारे गवत, पाने लांब व अरुंद, जनावरांना खाण्यास अयोग्य.
**उंची :** 40 ते 45 सें.मी.

वाघाविना जंगलाचा ऱ्हास होतो। अन् जंगलाविना वाघाचा!

## रान पोहा



**स्थानिक नाव :** **रान पोहा**

**शास्त्रीय नाव :** *Eragrostis tenella*

**उपयोगीता :** अखाद्य

**गवतांचा प्रकार :** वार्षिक

**फुलांचा कालावधी :** ऑक्टोबर – नोव्हेंबर

**बियांचा कालावधी :** डिसेंबर – जानेवारी

**आढळ :** उघडया, मोकळया क्षेत्रात, डबकी तलावाच्या कडेला आढळते

**इतर माहिती :** झुबकेदार ताठ वाढणारे खोड, पाने अखुड असून अखाद्य प्रकारचे गवत आहे.

**उंची :** 15 ते 45 सें.मी.

चितळ, तृणभक्षी

# जंगलातील सर्वसामान्य तण प्रजाती (WEED)


कोंबडा - *Celosia argentiana*


तरोटा - *Cassia tora*


घाणेरी / रायमुनीया - *Lantana camera*




गोखुरू - *Xanthium strumarium*


रान तुलसी - *Hyptis suaveolens*


बला / चिकणा - *Sida acuta*

# जंगलातील सर्वसामान्य तण प्रजाती (WEED)



केना - *Canna indica*



रेशिमकाटा - *Alternanthera sessilis*



गाजर गवत - *Parthenium hysterophorus*





जंगली तुलसी - *Ocimum basilicum*



तिळवन - *Cleome viscosa*



ओसाडी - *Ageratum conyzoides*

# गवती कुरणात आढळणारे गवत मित्र




रानमुग - *Phaseolus radiatus*



रान सोयाबीन



रान बरबट्टी





रान तूर - *Atylosia scarabaeoides*



रान उडीद



रान शेवरी - *Sesbania bispinosa*



दुधी - *Euphorbia geniculata*



रान खुळखुळा - *Crotalaria linifolia*

